# अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ

सत्र खटला क्र. ३४ /२०२०
निशाणी क्र. ८१

महाराष्ट्र शासन सरकारी अभियोक्ता
..वि..
राजू व इतर आरोपी.

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. ३** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की - | |
| माझे संपूर्ण नाव | सुरज सुभाषराव चिव्हाणे |
| वय अंदाजे ३६ वर्षे | धंदा- नौकरी, पोलीस नाईक, पोलीस स्टेशन, राळेगाव |
| राहणार | कळंब, ता. कळंब, ता. जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. एन. एन. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः-** | |

सन २०१२ मध्ये मी कळंब येथे राहत होतो. घटना अंदाजे १४ वर्षापूर्वी रात्री ९.३० वाजता घडली. पोलीस स्टेशनसमोर गर्दी होती, मात्र त्यानंतर मी तेथून निघून गेलो. मला असे कळाले की दगडफेक झाली होती. असे घडले नाही की आरोपींनी दिनांक १९/१/२०१२ रोजी पोलीसांना म्हटले की "अटक असलेल्या आरोपींना आमच्या ताब्यात द्या, आम्ही त्यांना पाहून घेतो" व नंतर आरोपींनी वाहनाची तोडफोड केली व बस स्टॅन्ड जवळील हॉटेल व पानठेल्यामधील सामानाची फेकफाक केली. पोलीसांनी माझ्याकडे विचारपूस केली होती.

**साक्षीदार त्यांच्या बयानाप्रमाणे पुरावा देत नसल्यामुळे त्याची उलटतपासणी घेण्याची परवानगी सरकारी वकिलांनी मागीतली. त्यानूसार परवानगी देण्यात आली.**

**उलटतपासणी सरकारतर्फे श्री. एन. एन. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत सुरुः–**

२. हे म्हणणे खरे नाही की मला आरोपी पोलीस स्टेशनजवळ दिसले. माझ्या बयानातील अधोरेखांकित भाग 'अ' मला आता वाचून दाखविला, मात्र तो बरोबर नाही. पोलीसांची व माझी दुश्मनी नाही. तसेच पोलीसांनी माझ्यावर कोणताही दबाव टाकला नाही.

**सत्र खटला क्र.३४/२०२०**
**शासन वि. राजू व इतर**

हे म्हणणे खरे नाही की आरोपी माझ्या गावात राहत असल्यामुळे मी त्यांना वाचविण्याकरीता आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपींचे वकील श्री. ईम्रान देशमुख यांनी उलटतपास नाकारला –**

३. उलटतपास नाकारला.

फेरतपास काही नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)

दिनांक – ०४/०५/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.